


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १९७●गुरूवार,दि.१६ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

## 'बँक ऑफ महाराष्ट्र'सह भारतातील ४ मोठ्या बँकांचे विलीनीकरण? खातेदारांचे पैसे 'या' बँकांमध्ये होणार ट्रान्सफर




**मुंबई । प्रतिनिधी**

भारतातील बँकिंग क्षेत्रात आणखी एक मोठा बदल होणार आहे. सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे (PSBs) मेगा विलीनीकरणावर करणार आहे. सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना मोठ्या बँकांमध्ये विलीन करण्याची योजना बनवली आहे. 'बँक ऑफ महाराष्ट्र'सह भारतातील ४ मोठ्या बँकांचे विलीनीकरण होणार आहे. खातेदारांवर याचा काय परिणाम होणार ? खातेदारांचे पैसे कोणत्या खात्यात वळवणार जाणून घेऊया कसा असेल हा मेगा प्लान.

इंडियन ओव्हरसीज बँक (IOB), सेंट्रल बँक ऑफ इंडिया (CBI), बँक ऑफ इंडिया (BOI) आणि बँक ऑफ महाराष्ट्र (BoM) या चार बँकांचे पंजाब नॅशनल बँक (PNB), बँक ऑफ बडोदा (BoB) आणि स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) सारख्या मोठ्या बँकांमध्ये विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रस्तावावर प्रथम वरिष्ठ कॅबिनेट अधिकाऱ्यांकडून चर्चा केली जाईल. यानंतर पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) त्याचा आढावा घेईल. २०२७ च्या आर्थिक वर्षातही चर्चा सुरू राहण्याची अपेक्षा आहे. वर्षाच्या आत एक रोडमॅप अंतिम केला जाऊ शकतो. तथापि, संबंधित बँकांचे विचार मागितले जातील आणि सल्लामसलतीसाठी वेळ दिला जाईल. सरकार कोणतीही औपचारिक घोषणा करण्यापूर्वी अंतर्गत सहमती निर्माण करू इच्छिते, असे सूत्रांनी सांगितले. केंद्र सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण करण्याची योजना आखत आहे. अशातच या चार मोठ्या बँकांच्या विलीनीकरनाचा प्रस्ताव समोर आला आहे. यापूर्वी २०१७ ते २०२० दरम्यान, सरकारने १० सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे चार मोठ्या संस्थांमध्ये विलीनीकरण केले होते, ज्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या २०१७ मध्ये २७ वरून १२ झाली. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ इंडियाचे पीएनबीमध्ये विलीनीकरण झाले, तर सिंडिकेट बँक कॅनरा बँकेत विलीन झाली.

### ना. भुजबळ यांच्या उपस्थितीत होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेस माजलगाव तालुक्यातील हजारो ओबीसी जाणार : संतोष रासवे

## माजलगाव तालुक्यातील गाव, तांड्यावरील ओबीसी एकवटणार!

**माजलगाव । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेच्या अनुषंगाने समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अम्ड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गाव, तांड्यावर बैठका घेण्यात



आल्या आहेत. माजलगाव तालुक्यातील दहा हजारापेक्षा अधिक ओबीसी समाज बांधव सभेला जाणार असल्याचे समता परिषदेचे माजलगाव तालुकाध्यक्ष जगन खेत्रे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडचे वादग्रस्त जेलर पेट्रस गायकवाड यांची बदली

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या जिल्हा कारागृहामध्ये बळजबरीने कायद्यांचे धर्मांतरण करण्याच्या आरोपावरून वादात सापडलेले कारागृह अधीक्षक पेट्रेस गायकवाड यांचे अखेर उचल बांगडी झाली असून थेट नागपूरला बदली करण्यात आली आहे.



बीडच्या जिल्हा कारागृहामध्ये जे बंदीवान कैदी आहेत त्यांच्यावर बळजबरीने धर्मांतरण करण्यासाठी कारागृह अधीक्षक गायकवाड हे बळजबरी करतात त्यांना जाणीवपूर्वक मारहाण करणे अन्नपाणी न देणे अशा प्रकारे त्रास दिला जातो असा आरोप या कायद्यांच्या वकिलाने तसेच भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर ▶▶ उर्वरित पान २ वर

### बीआर चोप्रांच्या महाभारतातील कुंतीपुत्र 'कर्ण' काळाच्या पडद्याआड

## दिग्गज अभिनेते पंकज धीर यांचं निधन

**मुंबई । प्रतिनिधी**

टेलिव्हिजन विश्वासवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. बीआर चोप्रांच्या महाभारतातली कुंतीपुत्र कर्णाची भूमिका अजरामर करणारे अभिनेते पंकज धीर काळाच्या पडद्याआड गेले आहेत. अभिनेते पंकज धीर यांच्या निधनाच्या बातमीला त्यांचे जवळचे मित्र अमित बहल यांनी दुजोरा दिला आहे. कर्करोगानं पंकज धीर यांचं निधन झालं असून त्यांच्या पश्च्यात




त्यांचा एक मुलगा आणि सून आहे. मुलगा निकितिन धीर इंडस्ट्रीत काम करत असून त्याची पत्नी कृतिका सेंगरसुद्धा अभिनेत्री आहे. मीडिया रिपोर्टनुसार, पंकज धीर ▶▶ उर्वरित पान २ वर

## बेपत्ता तरुणाचा मृतदेह पालीच्या तलावात

### मयत दोन दिवसांपासून गायब होता

**बीड । प्रतिनिधी**

घरातून निघून गेलेल्या एका २८ वर्षीय तरुणाचा मृतदेह आज सकाळी पालीच्या तलावात आढळून आला आहे. सदरील या घटनेची माहिती पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात आणले आहे. या तरुणाने आत्महत्या केली का काय? असा प्रश्न उपस्थित होत



आहे. पठार शहेबाज खान सलीम खान (वय २८ वर्षे, रा. मोमीनपुरा बीड) हा तरुण गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होता. त्याचा सर्वत्र शोध घेतला मात्र तो कुठेही आढळून ▶▶ उर्वरित पान २ वर

## यश ढाका खून प्रकरणातील चौथा आरोपी निखिल घोडकेला ठोकल्या बेड्या

### • पोलिस उपअधीक्षक पूजा पवार यांनी केले जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात माने कॉम्प्लेक्स परिसरात २५ सप्टेंबर रोजी रात्री ८:३० वाजता पत्रकार पुत्र यश ढाका याचा टोळक्यांनी हल्ला करत चाकू भोकसून हत्या करण्यात आली होती. बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स या गजबजलेल्या ठिकाणी लोकांसमोर हत्या करण्यात आल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. यश ढाकाचा हत्या करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर




व्हायरल झाला होते.या हत्या प्रकरणात तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात घेतले होते. यातील चौथा आरोपी निखिल घोडके रा.घोडका राजुरी याला मंगळवारी मध्यरात्री बीड पोलीस उपाधीक्षक पूजा पवार याला ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास घोडका राजुरी येथे स्वतः डीवायएसपी पूजा पवार यांनी सापळा रचून निखिल घोडके याला पकडले. या कारवाईनंतर पोलिसांच्या ताब्यात या प्रकरणातील एकूण चार आरोपी आले आहेत.यशच्या खुनानंतर पोलिसांनी तपास चार आरोपींना ताब्यात घेतले यातील तीन आरोपी बीड जिल्हा कारागृहात आहेत. निखिल घोडके कडून आणखी काही माहिती मिळते का ?या हत्या मध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का ?याचा तपास बीड पोलीस अधीक्षक पूजा पवार करत आहेत.

## बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बोलावली बैठक

**बीड । प्रतिनिधी**

आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात आज (दि.१६) सायंकाळी ४ वाजता बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा होणार आहे. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविली जाणार आहे. त्यामुळे आजच्या बैठकीस स्थानिक कार्यकर्ते, इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.



## सांगलीत चोऱ्या करणाऱ्या टोळ्याचा म्होरक्या आष्टीत पकडला

### शंभर कि.मी.च्या प्रवासात शंभर सीसीटीव्ही तपासले आष्टी पोलीस ठाण्याचे भुतेकर यांनी चोरटा पकडला

**आष्टी । प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यात मागील आठवड्यात भरदिवसा झालेल्या तीन घरफोड्यांनी संपूर्ण जिल्हा हादरला होता. दिवसाढवळ्या झालेल्या या चोऱ्यांमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. तब्बल ४७ तोळे सोने चोरीला गेलेल्या या थरारक घटनांचा उलगडा अखेर सांगली स्थानिक गुन्हे शाखा आणि आष्टी पोलिसांच्या संयुक्त कारवाईत झाला. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कासारी गावातील संतोष उर्फ नितेश मर्दान भोसले (वय २५) या युवकाला पोलिसांनी बेड्या ठोकत घरफोडी प्रकरणातील प्रमुख सूत्रधाराला पकडण्यात यश मिळवले आहे. सांगली



जिल्ह्यातील शिराळा आणि इस्लामपूर पोलीस ठाणे हद्दीत भरदिवसा तीन घरफोड्या झाल्या होत्या. चौकशीत या घरफोड्यांमागे आष्टी तालुक्यातील कासारी येथील भोसले टोळी असल्याचे ▶▶ उर्वरित पान २

## अतिवृष्टीचे २ कोटी ४५ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

**बीड । प्रतिनिधी**

जून ते सप्टेंबर या दरम्यान राज्यामध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. बीड जिल्ह्यातही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला होता. जून-ऑगस्टपयरत २ कोटी ४५ लाख रुपये वाटम करण्यात आले आहे. राज्यामध्ये यावर्षी मे महिन्यापासून पावसाला सुरुवात झाली. जून ते ऑगस्ट या दरम्यान मुसळधार पाऊस पडला. या पावेती पिकांचे मोठे नुकसान झाले. नुकसानग्रस्त पिकांची पाहणी पंचनामे झाल्यानंतर त्याचा अहवाल राज्य



सरकारकडे पाठविण्यात आला. राज्य सरकारने जून ते ऑगस्ट या दरम्यान जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप केले. जवळपास २ कोटी ४५ लाख रुपये वाटप करण्यात आले आहे. सप्टेंबर महिन्याची नुकसान भरपाई दिवाळीच्या आधी पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आह.

## पुण्यात मद्यधुंद पोलिसाच्या मोटारीचा थरार, दोन रिक्षासह अनेक गाड्यांना उडवलं; ७ जण जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली असून पोलिसानेच कायद्याचे उल्लघंन केलंय. पोलीस कॉन्स्टेबलने पुण्यात डंक अँड ड्राईव्ह क रत ६ गाड्यांना जबरदस्त धडक दिली आहे. या अपघात ७ जण जखमी झाले आहेत. ही घटना रांजणगाव गावात झाली असून त्या पोलीस कॉन्स्टेबलचं नाव हेमंत इनामे असं आहे. दारूच्या नशेत त्याच्या कारने अनेक गाड्यांना जोरदार धडक दिली. धक्कादायक म्हणजे



या प्रकरणात कॉन्स्टेबलला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. कॉन्स्टेबलच्या या कारनामामुळे या अपघातात बावीस वर्षीय अभिषेक पवार गंभीर जखमी झाला आहे. त्याच्या डाव्या पायला दोन ठिकाणी फ्रॅक्चर झाला आहे. त्यासोबत त्याच्या छातीला आणि पोटाला गंभीर जखम्या झाल्या आहेत. पुण्यातील खाजगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु आहे. हे प्रकरण दडपण्याचा

▶▶ उर्वरित पान २ वर




## पुण्याची कन्या ऑस्ट्रेलियाची राणी! 'मिस ऑस्ट्रेलिया २०२५' विजेती अबोली लोखंडे साई चरणी नतमस्तक

**शिर्डी । प्रतिनिधी**

करोडो भाविकांचं श्रद्धास्थान श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो भाविक दररोज शिर्डीत येतात. 'मिस ऑस्ट्रेलिया २०२५' ची विजेती मराठमोळी 'अबोली लोखंडे' हिनं सहपरिवार शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. अबोली ही मूळची पुण्याची रहिवासी असून, व्यावसायानिमित्त गेल्या पाच वर्षांपासून ती ऑस्ट्रेलियात स्थायिक



आहे. फॅशनच्या चकचक दुनियेत आपलं स्थान निर्माण केलं : मूळ पुणे येथील रहिवासी असलेली अबोली लोखंडे हिनं आपलं शिक्षण पुण्यात पूर्ण केल्यानंतर व्यावसायानिमित्त ती ऑस्ट्रेलियात स्थायिक झाली. सुरुवातीपासूनच अबोलीचं स्वप्न होतं की, फॅशनच्या चकचकीत दुनियेत आपलं स्थान निर्माण करायचं. मात्र, अनेक वर्षांपासून प्रयत्न करूनही स्वप्न प्रत्यक्षात उतरत नसल्यानं ती निराश झाली होती. अशावेळी साईबाबांचा 'श्रद्धा आणि सबुरी' हा महामंत्र तिला आठवला. त्या मंत्राचा आधार घेत तिनं मनात श्रद्धा ठेवली आणि सबुरीनं प्रयत्न सुरू ठेवले. अखेर ते स्वप्न साकार झाल्याची प्रतिक्रिया अबोली लोखंडे हिनं दिली.

'मिस ऑस्ट्रेलिया २०२५' स्पर्धेत मिळालं विजेतेपद : मराठमोळी अबोली ही लहानपणापासूनच ▶ उर्वरित पान २ वर



# भेसळयुक्त मिठाई : लोकांच्या जीवाशी खेळ !



नोएडातील सेक्टर ११५ मधील एका मिठाई बनवणाऱ्या युनिटवर दिल्लीच्या अन्न सुरक्षा विभागाने हल्लीच छापा टाकून ११00 किलो भेसळयुक्त मिठाई जप्त करून ती जागेवरच नष्ट केली. याच विभागाने जीबी नगर परिसरात आणखी एका ठिकाणी छापा टाकून १८0 किलो भेसळयुक्त मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थ जप्त केले. जयपूरच्या अन्न सुरक्षा विभागानेही अशाच एका कारवाईत ३५0 किलो भेसळयुक्त मिठाई. ६५0 किलो बनावट मिल्क केक आणि ५00 लिटर नकली दूध जप्त करून ते नष्ट केले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील अन्न आणि औषध प्रशासनाने सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा मोहिमेच्या अंतर्गत ३६ लाख रुपयांचा तब्बल ३0 हजार किलो निकृष्ट आणि भेसळयुक्त अन्नसाठा जप्त केला. दूध, मिठाई, तूप, पनीर, फरसाण यांसारख्या पदार्थांचे नमुने तपासले असता अनेक ठिकाणी भेसळ आढळली. दिवाळी जवळ आली कि मिठाईत भेसळ करून ती चढ्या दारात विकणाऱ्यांचे सर्वत्र पेव फुटते. या काळात सर्वत्र गोडधोडाचे वातावरण असल्याने घसा खवखवणे, खोकला सुरु होणे यांसारखे त्रास जाणवू लागले तरी ते मिठाईमुळे होत आहेत कि घरात बनवलेल्या तेलकट फराळामुळे ते कळत नाही. या दिवसांत प्रशासनाचा अन्न आणि औषध विभाग अलर्ट मोडवर असतो. कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या लोभाने ही भेसळयुक्त मिठाई बनवली जाते. भेसळयुक्त पेढे किंवा मिठाई खाल्यास घशात खवखव होते, खोकला येतो आणि पोटात दुखते. चक्कर येणे, पोटात मळमळणे , उलटी, जुलाब सुरु होणे यांसारखे परिणाम जाणवू लागतात. काविळसारख्या आजाराची लागण होऊ शकते. किडनी आणि यकृतावरही भेसळयुक्त मिठाईचा गंभीर परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही, तर विषबाधा अधिक झाल्यास खाणाऱ्याचा मृत्यूही ओढावू शकतो. भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास क्षयरोग होऊ शकतो. कृत्रिम दुधात युरियाची भेसळ असल्यास युरियातील नायट्रोजनमुळे मूत्रपिंड, यकृत आणि हृदय निकामी होऊ शकते. मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे दूध केमिकलयुक्त असल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत निष्पन्न झाल्यास भारतीय दंड विधान ३२८ कलमान्वये अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येतो. मिठाईसाठी वापरण्यात आलेल्या दुधात पाणी आणि दुधाची पावडर मिश्र केल्याचे आढळल्यास २६२ कलमान्वये गुन्हेगारास आर्थिक दंड ठोठावण्यात येतो. असे असूनही प्रतिवर्षी मिठाईत केल्या जाणाऱ्या भेसळीचे प्रमाण कमी न होता दरवर्षी त्यांमध्ये वाढच होत आहे. गणेशोत्सव आणि दिवाळीच्या काळात अनेक ठिकाणी भेसळयुक्त मिठाई सर्रासपणे विकली जाते. आर्थिक लाभासाठी पामतेलाचा वापर करून खवा बनवणे. कृत्रिम आणि केमिकलयुक्त दूध तयार करून त्यापासून मिठाई बनवणे यासारखे प्रकार सणासुदीच्या काळात प्रकर्षाने घडतात. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा महाभागांना खरेतर कठोर शिक्षा होणे अपेक्षित आहे ; मात्र अनेकदा ही मंडळी कायद्यातील पळवाटांचा लाभ घेऊन निर्दोष सुटतात किंवा जामिनावर बाहेर पडतात. यांमध्ये कायद्याचे भय न राहिल्याने दरवर्षी भेसळयुक्त मिठाई बनवून विकणाऱ्यांमध्ये वाढच होताना दिसत आहे. यांच्यावर कायमस्वरूपी वचक बसण्यासाठी कठोर कायद्यासह जनमानसांत जागृती होणे नितांत गरजेचे आहे. लोकांच्या जीवाचे सोयरसुतक नसणाऱ्यांना खरेतर आता जनतेनेच धडा शिकवायला हवा !

– सौ. मोक्षदा घाणेकर

# मध्यस्थी : वाद मिटविण्याचा सौहार्दपूर्ण मार्ग

वाद हे मानवी समाजातील अपरिहार्य वास्तव आहे, पण त्याचे समाधान सौहार्दपूर्ण पद्धतीने करणे ही खरी प्रगती आहे. हाच विचार लक्षात घेऊन भारत सरकारने मध्यस्थता कायदा, १९२३ लागू केला. या कायद्याचा उद्देश म्हणजे मध्यस्थीद्वारे वाद सोडवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करणे, मध्यस्थी करारांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, मध्यस्थांची नोंदणीसाठी संस्था उभी करणे तसेच सामुदायिक आणि ऑनलाइन मध्यस्थीला प्रोत्साहन देणे हा आहे.

मध्यस्थीची पार्श्वभूमी आणि कायदेशीर आधार– मध्यस्थीची कल्पना नवीन नसून लवाद आणि सामंजस्य कायदा १९९६ तसेच कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा १९८७ या कायद्यांनी या प्रक्रियेला मजबूत कायदेशीर पाया दिला. विशेषतः लोक अदालतची स्थापना ही न्यायालयीन व्यवस्थेबाहेर समझोत्याने वाद सोडवण्याच्या संकल्पनेला चालना देणारी ठरली. न्यायालयांतील वाढती खटले व त्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेता वैकल्पिक वाद निराकरण ही संकल्पना उदयास आली.

वैकल्पिक वाद निराकरणाची ( संकल्पना– म्हणजे पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेऐवजी जलद, सोपी आणि कमी खर्चिक उपाय देणारी प्रणाली. यात लवाद, सामंजस्य) आणि मध्यस्थी (चशवळरींळेप) या पद्धतींचा समावेश होतो. मध्यस्थी ही त्यातील सर्वाधिक लोकप्रिय आणि प्रभावी पद्धत मानली जाते.

मध्यस्थी म्हणजे काय?– मध्यस्थी ही एक स्वेच्छेची, गोपनीय आणि लवचिक प्रक्रिया आहे, ज्यात निष्पक्ष तृतीय पक्ष म्हणजे मध्यस्थ दोन्ही पक्षांना संवाद आणि समजुतीच्या माध्यमातून समाधानकारक तोडगा काढण्यास मदत करतो. न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा ही अधिक वेगवान, कमी खर्चिक आणि संबंध जपणारी असते.

मध्यस्थीचे फायदे– न्यायालयीन खटल्यांच्या तुलनेत वाद लवकर निकाली निघतात, खर्च कमी आणि प्रक्रिया सोपी असते. वादग्रस्त पक्षांची गोपनीयता राखली जाते तसेच निकालावर दोन्ही पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग आणि नियंत्रण असते. वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक नाती टिकवण्यासाठी मध्यस्थी उपयुक्त ठरते. प्रत्येक नागरिकाला वाद सोडवण्याचा सुलभ मार्ग उपलब्ध होतो, न्यायालयांवरील ताण कमी होतो आणि न्यायालयीन निकालांपेक्षा अधिक सर्जनशील उपाय सापडतात.



मध्यस्थीसाठी योग्य वादप्रकार– मध्यस्थीचा उपयोग कौटुंबिक वाद (घटस्फोट, मुलांची देखरेख, वारसा), व्यावसायिक वाद (करार, व्यवहार, भागीदारीतील मतभेद), शेजारी वाद (मालमत्ता, आवाजासंबंधी तक्रारी), कामगार वाद (कर्मचारी–नियोक्ता मतभेद) आणि ग्राहक तक्रारी (वस्तू किंवा सेवांशी संबंधित वाद) अशा विविध क्षेत्रांत केला जातो.

मध्यस्थीची प्रक्रिया– मध्यस्थ प्रथम प्रक्रिया समजावतो, नंतर दोन्ही पक्ष आपली मते मांडतात. त्यानंतर एकत्र किंवा स्वतंत्रपणे मध्यस्थाशी चर्चा होते. मध्यस्थ परस्पर समजुतीने हिताचा विचार करून तोडगा सुचवतो आणि शेवटी दोन्ही पक्षांच्या सहमतीने लेखी करारावर स्वाक्षऱ्या घेतल्या जातात.

मध्यस्थाची भूमिका– मध्यस्थ निष्पक्ष, तटस्थ आणि संवाद सुलभ करणारा असतो. तो प्रशिक्षित व्यावसायिक म्हणून वाद व्यवस्थापन आणि संवाद कौशल्याचा वापर करतो. त्याचा उद्देश कोणत्याही पक्षाचा पक्षपात न करता दोन्ही पक्षांना तोडग्याच्या दिशेने नेणे हा असतो.

मध्यस्थी : शांततामय समाजाची पायाभरणी– भारतामध्ये मध्यस्थीबाबत जागरूकता झपाट्याने वाढत आहे. राष्ट्रीय लोक अदालतींमधून हजारो प्रकरणे मैत्रीपूर्ण पद्धतीने सोडवली गेली आहेत. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे जनतेला मोफत कायदेशीर मदत पुरवून मध्यस्थीला प्रोत्साहन देतात. त्यामुळे सर्वांसाठी न्याय ही संकल्पना प्रत्यक्षात उतरते आणि समाजात सौहार्द वृद्धिंगत होते.

पुण्यातील यशस्वी मध्यस्थी उपक्रम– पुण्यात मध्यस्थीद्वारे वाद सौहार्दपूर्ण पद्धतीने सोडवण्याच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'मेडिएशन फॉर द नेशन ड्राइव्ह' या उपक्रमात तब्बल १,९२२ प्रकरणे मध्यस्थीद्वारे समाधानकारक रित्या निकाली निघाली. या मोहिमेमुळे वैकल्पिक वाद निराकरण यंत्रणांचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण महेंद्र के. महाजन म्हणतात, मध्यस्थी ही संघर्षांना सकारात्मक पद्धतीने सोडवण्याची दिशा देते. ती नातेसंबंध जपत समाजात सौहार्द वाढवते. पुण्यात मध्यस्थीला अधिक बळकटी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सदस्य सचिव सोनल पाटील म्हणतात, मध्यस्थीद्वारे आम्ही पक्षकारांना परस्परसंमतीने समाधानकारक तोडगे शोधण्यासाठी सक्षम करतो. ही सर्वांपर्यंत न्याय पोहोचवण्याची आणि समाजात समेट व ऐक्य प्रस्थापित करण्याची प्रक्रिया आहे.

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या या यशस्वी उपक्रमामुळे मध्यस्थीला नवा वेग मिळाला आहे. मध्यस्थी ही केवळ वाद सोडवण्याची पद्धत नाही, तर ती संवाद, समजूत आणि सौहार्द यांचा सेतू आहे. या प्रयत्नांनी समाजात शांततेचा आणि न्यायाचा संदेश दिला आहे.

– संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

◆ पान 9 वरून पुढे...

## ना. भुजबळ यांच्या...

युवा नेते संतोष रासवे यांनी सांगितले आहे. शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला माजलगाव तालुक्यातून दहा हजारापेक्षा अधिक ओबीसी समाज बांधव उपस्थित राहणार असल्याचे समता परिषदेचे माजलगाव तालुका अध्यक्ष जगन खेत्रे, युवानेते संतोष रासवे यांनी सांगितले आहे.

## बीडचे वादग्रस्त ...

◆ पान 9 वरून पुढे...

यांनी केला होता यानंतर महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली होती अगोदरच जळगाव येथील एका बंदीवान कायद्याच्या खून प्रकरणात वादात अडकलेले गायकवाड हे बीडमध्ये आल्यानंतर पुन्हा वादग्रस्त ठरले त्यामुळे अखेर त्यांची बीड येथून उचल बांगडी करण्यात आले असून त्यांना नागपूर येथे उपाधीक्षक म्हणून पाठवण्यात आले आहे.

## बीआर चोप्रांच्या....

यांना कर्करोग झालेला, पण मोठ्या धीरानं कॅन्सरशी लढा देऊन ते बरेही झालेले. पण, काळाला काही वेगळंच मान्य होतं. काही महिन्यांतच कॅन्सर उलटला आणि त्यातच त्यांचं निधन झालं. बराच काळ ते कर्करोगाशी झुंज देत होते. त्यांची प्रकृती गंभीर होती. कॅन्सरमुळे त्यांच्यावर मोठी शस्त्रक्रिया झालेली, पण अखेर कॅन्सर जिंकला आणि पंकज धीर यांचं निधन झालं. पंकज यांच्या निधनाच्या बातमीने सोशल मीडियावर टीव्ही इंडस्ट्रीमध्ये शोककळा पसरली आहे. चाहतेही असह्य झाले आहेत. चाहते आणि सेलिब्रिटी अश्रूंनी पंकज यांना श्रद्धांजली वाहत आहेत. पंकज धीर यांनी टीव्ही आणि सिनेक्षत्रात अनेक प्रोजेक्ट्स केलेत. दरम्यान, १९८८ मध्ये प्रदर्शित झालेल्या बीआर चोप्रांच्या महाभारत या मालिकेनं त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. या मालिकेत त्यानं कर्णाची भूमिका साकारलेली. त्यानं ज्या गांभीर्यानं ही भूमिका साकारली, त्याचं उदाहरण आजही दिलं जातं. कर्णाची भूमिका साकारल्यानंतर त्यांना कर्ण म्हणूनच ओळखलं जाऊ लागलं. टीव्ही शो व्यतिरिक्त, पंकजनं चित्रपटांमध्येही काम केलं. ते चंद्रकांता आणि द ग्रेट मराठा यासारख्या अनेक पौराणिक शोचा भाग होते.

◆ पान 9 वरून पुढे...

त्यांनी सोल्जर, बादशाह आणि सडक यांसारख्या हिंदी चित्रपटांमध्येही काम केलंय.

## बेपत्ता तरुणाचा ....

आला नाही.त याचा आज सकाळी पालीच्या तलावात मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात आणला. या तरुणाने आत्महत्या केली की काय, असा सवाल उपस्थित होत आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## सांगलीत चोऱ्या...

स्पष्ट झाले. सांगली पोलिसांनी तब्बल १०० किलोमीटरहून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले, तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार महिलेने आरोपींची ओळख पटवली. यानंतर त्यांच्या दुचाकीवरील क्रमांकावरून पोलिसांनी

## पुण्यात मद्यधुंद....

प्रयत्न होत असल्याचा आरोप अभिषेकच्या आई आणि नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान पोलिसांना घटनास्थळी पोलीस कॉनस्टेबल हेमंत इनामेचा फोन सापडला होता. पण त्यावेळी इमानेचा बायकोने जखमींचा उपचारांचा खर्च देण्याचे आश्वासन देऊन फोन ताब्यात घेतला. पण त्यानंतर त्यांनी उपचारांचा खर्च देण्यास नकार दिल्यामुळे हे प्रकरण चिघळलं आहे. दरम्यान तर दुसरीकडे हा जामीनपात्र गुन्हा असल्याने यामध्ये पोलीस

◆ पान 9 वरून पुढे...

कॉन्स्टेबल हेमंत इनामेला अटक करण्याची गरज नाही असं पुणे ग्रामीण पोलिसांनी स्पष्ट केलं आह.

## पुण्याची कन्या....

शिर्डी साईबाबांची परमभक्त आहे. त्यामुळं ती नेहमी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येत असते. फॅशनच्या दुनियेत यश मिळवण्याचं तिचं स्वप्न साईबाबांच्या आशीर्वादानं पूर्ण झाल्याचं ती सांगते. दोन महिन्यांपूर्वी ऑस्ट्रेलियात पार पडलेल्या 'मिस ऑस्ट्रेलिया २०२५' या फॅशन स्पर्धेत विजेतेपद पटकावल्यानंतर अबोली लोखंडे हिनं सहपरिवार शिर्डीत येऊन साईबाबांच्या आरतीला हजेरी लावली आणि साई समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. मी शिर्डी साईबाबांची परमभक्त आहे. मी नेहमी साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येते. साईबाबांच्या श्रद्धा–सबुरी या महामंत्रामुळेच मला हे यश मिळालं असून, साईबाबांचे आभार मानण्यासाठीच मी येथे आले आहे. – अबोली लोखंडे, मिस ऑस्ट्रेलिया २०२५ विजेती

साईबाबांच्या चरणी ठेवला मुकुट : 'मिस ऑस्ट्रेलिया २०२५' स्पर्धेत विजेती म्हणून तिला मिळालेला मुकुट तिने साईबाबांच्या चरणी ठेवून मनोभावे दर्शन घेतलं. आता अबोली लोखंडे 'मिस वर्ल्ड' स्पर्धेसाठी तयारी करत असून, साईबाबांच्या कृपेने मी नक्कीच मिस वर्ल्ड होईन, असा ठाम विश्वास तिने व्यक्त केला. साईबाबांच्या दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी अबोली लोखंडे हिचा साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड जिल्हा....

प्रकारचे क्रीडा सुरक्षा साधने असणे बंधकारक असतील, सोबत जन्मदाखला, आधारकार्ड व दोन पासपोर्ट फोटो असणे आवश्यक असल्याची माहिती बीड जिल्हा रोल बॉल असोसिएशन चे सचिव राम दास गिरी यांनी दिली. सदर स्पर्धामध्ये जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेवून बीड जील्हाचे नावलौकिक करावे व क्रीडा गुण सवलतीचा लाभ घाव्या असे आवाहन प्रशिक्षक वैभव गिरी यांनी केले.

## तुळजाभवानी अर्बन...

जाहीर झाला. या पुरस्काराचे वितरण १३ ऑक्टोबर २०२५ रोजी गोकर्ण, कर्नाटक येथे आयोजित भव्य कार्यक्रमात करण्यात आले आहे.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेजूळ व उप मुख्य कार्यकारी श्री. अशोक शेजूळ यांनी दिपस्तंभ पुरस्कार स्वीकारला संस्थेच्या सर्वांगीण प्रगती, नाविन्यपूर्ण सेवा व सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा सन्मान म्हणून हा गौरव मिळाल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे. संस्थेच्या या यशाबद्दल अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब, सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब, तसेच संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी आनंद व्यक्त केला. हा पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे

◆ पान ४ वरून पुढे...

प्रतिक आहे. तुळजाभवानी अर्बनने सदैव सभासद व ग्राहककेंद्री काम केले आहे. भविष्यात आणखी आधुनिक सुविधा व उत्तम सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे, असे अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब यांनी सांगितले.

## सामाजिक उपक्रम....

नुकतीच पर्जन्यवृष्टी जास्त प्रमाणात झाल्यामुळे दूषित दूषित पाण्यापासून कुठले आजार होऊ नये म्हणून ५०० मेडिक्लोर ड्रॉपचे वाटप करण्यात आले .माजलगाव शहराजवळ असलेल्या देवखेडा गोशाळेला आर्थिक देणगी दिली. सायंकाळी सात वाजता श्री गणेशाची पूजा व शांती पाठ करून माजलगाव शहरातील सर्व जनता सुखी समाधानी राहावी म्हणून ५१ ब्रह्मवृंदांच्या हस्ते पूजा अर्चना केली . वाढदिवसानिमित्त कुठलीही बॅनरबाजी न करता व केक कट न करता साध्या पद्धतीने विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला. रत्नपारखी यांना वाढदिवसानिमित्त लोकनेत्या नामदार पंकजा मुंडे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आयुष्यमान भारतचे राज्यप्रमुख ओमप्रकाश शेटे राष्ट्रवादीचे रमेश आडसकर भाजपा ज्येष्ठ नेते डॉ प्रकाश आनंदगावकर ज्ञानेश्वर मेंडके अनिल मुळे अँड विश्वजित देशपांडे संजय मालानी यांनी दूरध्वनीच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. तर

◆ पान ४ वरून पुढे...

वाढदिवसानिमित्त झालेल्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमास प्रत्यक्ष विविध कार्यक्रमाला उपस्थित राहनारे राज्य परिषद सदस्य अरुण राऊत प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील . राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी जगदीश साखरे पत्रकार उमेश मोगरेकर दीपक मेंडके तुकाराम येवले कमलेश जाबरस आनंत शास्त्री जोशी मा नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके रूपाली कचरे पूजा मुंडकर दैनिक कार्यारंभचे संपादक शिवाजी रांजवण मा ता अध्यक्ष हनुमान कदम मा नगराध्यक्ष शेख मंजूर ,, आकाश गुलानी प्रशांत भानप अभय होके अविनाश कांडूरे, संतोष वाघमारे मदन पांढरे डॉ उद्धव नाईकनवरे राहुल लंगडे ईश्वर खुरपे पवन मोगरेकर दत्ता काळे भालचंद्र पाठक बी एन कुलकर्णी , दत्ता महाजन , राज कदम राहुल देशमुख अनंत कुलकर्णी सतीश जोशी , राम शिंदे, प्रल्हाद दळवी कैलास खुरपे,,,बाळासाहेब क्षिररसागर,, डॉ सचीन देशमुख डॉ स्वानंद कुलकर्णी डॉ किशोर रत्नपारखी रविंद्र कानडे , नामदेव मुळे निरंजन वाघमारे प्रशांत भानप साहेब , निखिल वाघमारे संतोष जाधव रामेश्वर चव्हाण गौरी देशमुख छाया कुलकर्णी चित्रा पाठक भारती घुबडे. अनिता अलकुंटे मुकुंद जोशी पत्रकार कमलेश जाबरस , संजय मालानी उमेश जेथलिया, प्रदीप कुलकर्णी कैलास जोशी ऋषिकेश पाठक हरिभाऊ नवले सुभाष कांबळे रमाकांत जवळेकर मंगेश उपाध्य सुधीर जोशी मनोज बिंदू कार्यक्रमास उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## वैज्ञानिक दृष्टिकोनातून...

होतो तो आपण समजावून घेतला पाहीजे व वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सक वृत्तीने त्याकडे पाहण्याची गरज आहे असे प्रतिपादन डॉ. संजय तुपे यांनी केले. भौतिकशास्त्राचे मानवाच्या दैनंदिन जिवनातील उपयोग याविषयावर त्यांनी पॉवरपॉईट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील घटकांशी निगडीत उदाहरणे देवून स्पष्टीकरण केले. याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र विभाग प्रमुख तथा प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात भौतिकशास्त्र विभागात असणा–या पदवी पदव्युत्तर व संशोधन केंद्राचा लाभ विद्यार्थ्यांनी करुन घ्यावा व भौतिकशास्त्राचे जीवनातील उपयोगासंदर्भात शास्त्रज्ञांचे योगदान समजावून घ्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. याकार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रस्ताविक वाचन प्रो.डॉ. अशोक डोंगरे यांनी केले. पाहुण्यांचा परीचय डॉ. शिवाजी राउत यांनी करुन दिला तर आभार हे श्री. रुपेश कोकाटे मानले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. ए.एस.खान, पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर, प्राध्यापक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# लाडेवडगावात ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्याला गर्दी





**• संत, कीर्तनकारांची उपस्थिती ; ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन**

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या एकसष्ठी सोहळ्यानिमित्त अखंड रामकृष्णहरी नामजप यज्ञ सोहळ्याची सांगता लाडेवडगाव येथील वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमावर मंगळवारी (दि. १४) झाली. यावेळी ज्ञानसिंधू ह.भ.प. संदिपान महाराज हासेगावकर यांचे सुश्राव्य कीर्तन पार पडले. या सोहळ्यास स्वामी भारतानंद गिरी, नामदेव महाराज शास्त्री, महादेव महाराज चाकरवाडीकर, लक्ष्मण महाराज मेंगडे, आदिनाथ महाराज, मनिषानंद स्वामी, सोपान महाराज सानप, महारुद्र खाडे महाराज, प्रकाश महाराज साठे, नाना महाराज कदम, पांडुरंग महाराज मुंडे, डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री, आप्पा महाराज चौरे, अर्जुन महाराज लटपटे, पांडुरंग महाराज डोंगरेश्वर यांच्यासह राज्यभरातील वारकरी संप्रदायातील संत-महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील माजी मंत्री पंडितराव दौंड, नंदकिशोर मुंदडा, रमेश आडसकर, काशीराम कराड, भाई ज्ञानोबा मुंडे, बन्सी सिरसट, संतोष हांगे, विष्णू घुले, हिंदूलाल काकडे, नेताजी शिंदे, सूर्यभान मुंडे, पिंटू ठोंबरे, सौरभ सोनवणे, भगवान केदार, दत्ता धस, अयोध्याताई केंद्रे आदी मान्यवरही उपस्थित होते. यावेळी मान्यवरांसह अनेकांनी अर्जुन महाराज लाड यांचे अभिष्टचिंतन करत सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लाडेवडगाव व होळ ग्रामस्थांसह भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रमाचे आजी-माजी विद्यार्थी आणि भाविकांनी परिश्रम घेतले.

### नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते अर्जुन महाराज लाड यांचा सत्कार

**नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते अर्जुन महाराज लाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना ते म्हणाले, अर्जुन महाराज लाड यांनी वेदांत साधनास्थली गुरुकुल आश्रम व भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना करून वारकरी संप्रदायात मोठे योगदान दिले आहे. त्यांनी आयुष्याची ६१ वर्षे पूर्ण केली असून ते ३४ अपघातांतून बचावले आहेत. यामागे पांडुरंगाची कृपा आहे. भगवानगडाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत असून ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिरानंतर पहिल्यांदाच भगवानगडावर मंदिर उभारण्यात येत आहे. त्या सोहळ्याचे निमंत्रणही याप्रसंगी देण्यात आले.**

### राज्यभरातून भाविकांची हजेरी

**अर्जुन महाराज लाड यांचे अनुयायी, भाविक व विद्यार्थी राज्यभरात मोठ्या संख्येने आहेत. या सोहळ्यास भाविकांची लक्षणीय गर्दी होती. यावेळी मांडे जेवणाचा आस्वाद घेण्यात आला. कार्यक्रमासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.**

# बीड जिल्ह्यात काँग्रेस स्वबळावर लढणार : राहुल सोनवणे

**• निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची बैठक संपन्न**

**बीड । प्रतिनिधी**




आगामी होवु घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आज बीड येथे बीड तालुका व शहर काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह बीड या ठिकाणी घेण्यात आली. या बैठकीस काँग्रेसचे बीड विधानसभा निरीक्षक अन्वर देशमुख, दादासाहेब मुंडे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे पाटील, परवेज कुरेशी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी बीड तालुक्यातील आठ जिल्हा परिषद व सोळा पंचायत समिती गणांचा आढावा व वर्तमान परिस्थितीचा आढावा मांडला त्याच बरोबर शहराध्यक्ष यांनी शहराचा आढावा दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे, निरीक्षक अन्वर देशमुख, दादासाहेब मुंडे आदी पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे म्हणाले की, काँग्रेस पक्ष स्वतंत्र विचारधारा असलेला राष्ट्रीय पक्ष असुन सर्व जाती धर्माला सोबत घेऊन काम करणारा देशातील एकमेव पक्ष आहे. देशात राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेस सातत्याने सर्वसामान्यांच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरत आहे. बीड जिल्ह्यात काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग असुन अलीकडच्या काळात आघाडीच्या राजकारणात काँग्रेस जिल्ह्यात न लढल्यामुळे पक्ष संघटनेचे देखील नुकसान झालेले आहे. प्रामाणिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मागील काळात लढण्याची संधी मिळाली नाही याची खंत आम्हाला देखील आहे. येणाऱ्या काळात काँग्रेसला सन्मानजनक आघाडीत वाटा मिळाला तर आम्ही आघाडीत राहु नसता जिल्ह्यातील सर्व नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आमच्या नेत्या खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस स्वबळावर लढणार असुन कार्यकर्त्यांनी पुर्ण ताकतीने निवडणुकीच्याकामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक इलियास टेलर, माजी नगरसेवक शफीक जमादार, फरीद देशमुख, शेख सिराज, रमेश पाटील, संतोष निकाळजे, विद्या गायकवाड, शेख मोहसीन, राहुल साळवे, गणेश करंडे, अक्षय मुळे, अमोल पाठक, गणेश जवकर, शेख कादर बाबमिया, भैय्या गोरे, ओंकार नवले, अविनाश डरपे, पिनू डांगे, श्रीमंत घोडके, लक्ष्मण पवळ, कल्याण टेकाळे, अशोक जोगदंड, अशोक बहिरवाल, आकाश मस्के, मिलिंद मस्के, विशाल साबळे, आशिष सोनवणे, शेख मुशर्रफ, शेख साद, इंजि. जमील अन्सारी, सय्यद फरहान, आदित्य मस्के, शेख नेहल, सोफियान शहा, आहेतशाम शेख, सफदर देशमुख, शेख अब्बास, शेख जहीर, शेख जमील यांच्यासह असंख्य पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते.

# राजर्षी शाहू कन्या प्राथमिक विद्यालयात हस्तकला प्रदर्शन व दिवाळी स्नेहसंमेलन उत्साहात पार

**बीड । प्रतिनिधी**



श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक विद्यालयात कार्यानुभव उपक्रमांतर्गत हस्तकला प्रदर्शन आणि दिवाळीनिमित्त स्नेहसंमेलन आज अत्यंत उत्साहात पार पडले. या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव (दादा) जाहेर पाटील, सचिव प्रा. जे. पी. शेळके, मुख्याध्यापक श्री. आर. टी. राऊत, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, तसेच राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाला सहशिक्षिका श्रीमती जी. डी. कदम, श्रीमती एम. एस. सोनवणे, आणि श्रीमती आर. एस. रसाळ यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थिनींनी कल्पकतेने व उत्साहाने विविध आकर्षक आणि उपयुक्त हस्तकला वस्तू तयार करून सादर केल्या. त्यांच्या कलात्मकतेचे संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव (दादा) जाहेर पाटील व सचिव प्रा. जे. पी. शेळके यांनी मनःपूर्वक कौतुक करत विद्यार्थिनींना प्रेरणादायी मार्गदर्शन दिले. प्रदर्शनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनींना आकर्षक बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार आणि अभिनंदन करण्यात आले. दिवाळीनिमित्त आयोजित स्नेहसंमेलनात विद्यार्थिनींना पारंपरिक फराळाचे वाटप करण्यात आले.

## पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था,बीड संचलित पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी, ता.जि.बीड विद्यालयात दि. १५/१०/२०२५ बुधवार रोजी राष्ट्रपती मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाते डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय श्री प्रदीप जगताप सर यांनी मिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमांचे पूजन करुन विनम्र अभिवादन केले. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या कार्याविषयी शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . शाळेतील श्री ढगे सर यांनीही वैज्ञानिक डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे कार्य सांगितले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. जोशी सर, श्री ढगे सर, श्री येवले सर, श्री गाडेकर सर, श्री चौधरी सर, श्री देशमाने सर, श्री काशीद सर, श्री भरणे सर, श्री खटाणे सर, नाईकवाडे सर, श्री शेवते सर, श्री जाधव सर, श्री कोळेकर सर, श्री वाघमारे सर, श्री देशमाने बाळासाहेब, श्री दत्ता साळवे तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित राहून डॉ .एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

# विपरीत वातावरणीय बदलांना विविध गोष्टी कारणीभूत ; सकारात्मक बदलांची नितांत गरज : मयंक गांधी

## ▪ पत्रकार परिषद घेऊन ग्लोबल विकास ट्रस्टकडून श्वेतपत्रिकेचे विमोचन



**परळी वै. । प्रतिनिधी**

मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याने जागतिक तापमानात वाढ झाली असल्याने विपरीत पर्यावरणीय बदल दिसून येत आहेत. मराठवाडा किंवा अनेक भागांमध्ये झालेली अतिवृष्टी किंवा पावसाची अनियमितता याला अनेक गोष्टी कारणीभूत असून, या सर्व बाबींचा अंतर्भाव असलेली श्वेतपत्रिका ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने प्रकाशित करण्यात आली. सिरसाळा येथील कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे बुधवार (१५) रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेस जलनायक मयंक गांधी यांनी संबोधित केले. यावेळी डॉ.हरिश्चंद्र वंगे यांच्यासह भूगर्भ शास्त्रज्ञ देवेंद्र जोशी यांची उपस्थिती होती. यू.एन.डी. आर.आर, आराईझ, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, तृप्त धारा निर्मल आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा अतिवृष्टी श्वेतपत्रिका - आपत्तीचे विश्लेषण आणि भविष्यकालीन उपाययोजना ही पत्रिका जाहीर करण्यात आली. याबाबत घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, पर्यावरणीय बदलांचा समतोल बदलत गेल्याने पावसाची अनियमितता तसेच अतिवृष्टीसाखे आपत्तीचे प्रसंग सतत ओढवत आहेत. यंदाच्या ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीने मराठवाड्याला बेचिराख केले, मोठ्या प्रमाणावर हानी झाली. असा प्रसंग पहिल्यांदाच घडतोय असे नाही तर यापूर्वीही अनेकवेळा घडले आहेत. त्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत असून मुख्यतः वृक्षतोड, जागतिक तापमानवाढ, पावसाचे असमान वाटप आणि जलसंधारणाच्या कामांचा अभाव अशा प्रमुख कारणांचा समावेश आहे. भौगोलिक परिस्थितीही कारणीभूत असून अनेकवेळा त्यामुळेही पूरपरिस्थिती निर्माण होते. हे भविष्यात घडू नये याच्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व्हायला हवी, जलसंधारणाची कामे होणे गरजेचे असल्याचे मयंक गांधी यांनी म्हटले आहे.

### • पत्रकारांचे कौटुंबिक स्नेहमिलन

**पत्रकारांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सिरसाळा येथील जागतिक दर्जाचे कृषिकुल पाहता यावे यासाठी दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी १२ ते ०३ दरम्यान आयोजित कार्यमात सहभागी झालेल्या पत्रकार कुटुंबियांनी कृषिकुल येथे असलेल्या सर्व उपलब्ध सोयी - सुविधांची पाहणी केली. माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण कक्ष, देवराई, यंत्रसामुग्री कक्ष, गोशाळा तसेच विविध प्रकारच्या फळबाग प्लॉटची पाहणी केली व कृषिकुल परिसरात उभारण्यात आलेल्या कृषी महादेव मंदिरातील प्रभूंचे दर्शन घेतला. सर्वांनी एकमेकांना दीपावली निमित्त शुभेच्छांची आदान - प्रदान केली. सिरसाळा व परळी वैजनाथ येथील सर्व पत्रकारांची कुटुंबीयांसह उपस्थिती होती.**

# लिंबागणेश जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा

**लिंबागणेश । प्रतिनिधी**




भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त बीड तालुक्यातील लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमामागचा उद्देश वाचन संस्कृती वाढवणे, मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करणे, ज्ञानसंपन्न व माहितीसमृद्ध समाज घडविणे हा आहे. राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय शैक्षणिक संस्था दरवर्षी या दिवशी विविध वाचन उपक्रम राबवतात, तर काही ठिकाणी १५ ते २२ ऑक्टोबर या आठवड्यात वाचन प्रेरणा सप्ताह सुद्धा साजरा केला जातो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी केंद्रप्रमुख ,मुख्याध्यापक दीपक घाटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर याची उपस्थिती होती. सहशिक्षिका श्रीमती सुवर्णा गीते उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा अयाचित यांनी केले तर आभारप्रदर्शन श्रीमती ज्योती सानप यांनी केले. या प्रसंगी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांचे स्मरण करून देत चांगले पुस्तक हे शंभर मित्रांसारखे असते या उक्तीवर आधारित वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके तसेच महान व्यक्तींच्या सचित्र चरित्रांचे वाचन केले. मुख्याध्यापक दीपक घाटे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या विद्यार्थ्यांबद्दलच्या प्रेमभावनेची आणि कार्याची ओळख करून दिली. डॉ. गणेश ढवळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. चांगल्या पुस्तकांचा आणि विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो व आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो, त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज १२९८ / २०२५

तुषार पि. रावसाहेब गुजर व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. व्दारकाबाई लिंबाजी उबाळे, वय ५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. नाथापुर, ता.जि. बीड, २. संदिप पि. लिंबाजी उबाळे, वय-२७, वर्षे, धंदा-शेती. रा. सदर. ३. दिपक पि. लिंबाजी उबाळे, वय-२५ वर्षे, धंदा-शेती. रा. सदर.

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यानी या न्यायालयात मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे याच वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचा मृत्यु दिनांक ०८.०७.२०१५ रोजी नाधापुर ता. जि. बीड झाला असुन अर्जदार के ०१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे मूले आहेत हे मयताचे कायदेशीर वारस आहे

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याने आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत को. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर मदरहु कोर्ट मदरहु अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लिंबाजी पि. आसाराम उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या महीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६ सप्टेंबर २०२५

(मार्फत- ॲड. वाय आर शेळके)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज १५६९ / २०२५

द्वारका विरुध्द निरंक

अर्जदार- १. द्वारका भ्र. हनुमान मस्के, वय - ५५ वर्षे, धंदा - घरकाम, २. हनुमान पि. किसन मस्के, वय - ६५ वर्षे, धंदा- शेती, दोघे रा. पालवण ता. जि. बीड

विरुद निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांचा मृत्यु दिनांक १९/०५/२०२४ रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ व २ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क. १ व २ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क. १ व २ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत स्वानंद पि. हनुमान मस्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६/११/२०२५ आहे.

(मार्फत- ॲड.एस.एस.महाजन)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ●गुरूवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ ● पान ४



*बीड : भारत स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील वासुदेव आला हो वासुदेव आला, सकाळच्या पारी हरिनाम बोला असे अभंग आणि गवळणी गात दान मागणारा लोककलाकार वासुदेव यांची भेट त्यांच्याशी संवाद साधला असता वासुदेव समाज विकासाच्या बाबतीत कोसो दूर असल्याचे जाणवले.*

# आष्टी तालुक्यात पुणे येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात

## सामाजिक बांधिलकी जपत जैन श्रावक संघाची मानवतेचा संदेश

**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या महिन्यात आष्टी मतदारसंघातील अनेक गावांमध्ये आलेल्या प्रचंड पावसामुळे आणि अनपेक्षित पूरपरिस्थितीमुळे शेकडो शेतकऱ्यांचे घर, संसार, पिके आणि जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, जीवन विस्कळीत झाले आणि दिवाळीच्या उंबरठ्यावर हतबलतेचे वातावरण पसरले.अशा परिस्थितीत या पूरग्रस्त बांधवांना दिलासा देण्यासाठी पुणे (चंदननगर) येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांनी सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात पुढे केला आहे. या दोन्ही संस्थांनी एकत्रितपणे दिवाळी गोड करा या भावनेतून किराणा किट, साडी, ड्रेस मटेरियल, ब्लँकेट, आवश्यक वस्तू अशा विविध जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजाच्या सेवेसाठी तत्पर असलेल्या या संस्थांच्या माध्यमातून पूरग्रस्त कुटुंबांना



दिलासा मिळाला. पुण्यातील उद्योजक आणि जैन बांधवांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आपणही समाजाचे काहीतरी देणं लागतो या उदात्त भावनेतून त्यांनी हा उपक्रम राबवला.

आष्टी तालुक्यात आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली सांगवी आष्टी, धामणगाव, खडकत, घाटापिंपरी या गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन शेकडो कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात अमित गुंदेचा, अनिल कांकरिया,सचिन गुंदेचा, निलेश रुणवाल, हर्षद लुनिया, परेश कटारिया, डॉ. योगेश कांकरिया, सागर रुणवाल आदी जैन श्रावळ संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मदतीबद्दल मराठवाडाभूषण लोकनेते आ.सुरेश आण्णा धस प्रतिष्ठान व गावकऱ्यांच्यावतीने जैन श्रावळ संघाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत त्यांचा सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात...


### तडीपार आरोपी मिळून आला.. पोलिसांनी केले अटक

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १४/११/२०२५ रोजी बीड शहरात आयोजित हिंदू जन आक्रोश मोर्चा या सभेदरम्यान स्टेज परिसरात एक संशयास्पद व्यक्ती फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. सदर व्यक्तीची तपासणी केली असता तो तडीपार असल्याचे निष्पन्न झाले. सदर व्यक्तीचे नाव – अजय अशोक तांदळे (वय २४ वर्षे, रा. कोरेगाव, ता. केज, जि. बीड) असे असून, त्याच्यावर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, जबरी लुटमार अशा गंभीर गुन्ह्यांचे विविध गुन्हे दाखल आहेत. तो सध्या तडीपारीचा आदेश लागू असतानाही बीड शहराच्या हद्दीत उपस्थित होता. त्यामुळे त्याने तडीपारी आदेशाचे उल्लंघन केले असल्याने त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ सह कलम ४१ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर आरोपीस ताबडतोब पोलिसांनी पकडून त्याची ओळख व परिस्थितीची खात्री केली. त्यानंतर आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू आहे. सभेदरम्यान कोणतीही अनुचित घटना न घडता कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांच्या तत्पर आणि दक्ष कारवाईबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित पथकाचे कौतुक केले आहे.

### प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करावा : डॉ. राजेंद्र कांकरिया

**बीड । प्रतिनिधी**



नवगण शिक्षण संस्थेचे सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बीड च्या भौतिकशास्त्र विभाग आणि संशोधन समिती यांच्या वतीने बुधवार दि. १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त माजी कुलसचिव, माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र कांकरिया यांचे ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना त्यांनी प्रत्येकाने जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करावा असे आवाहन केले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर चे माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया हे वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर व्याख्यानात बोलत असताना, त्यांनी तंत्रज्ञानाचा सेकंदा सेंकदातला होणारा वापर, विज्ञानाने लावलेले शोध, वैज्ञानिक दृष्टिकोनाची सुरुवात, विज्ञानाची प्रगती अशा अनेक मुद्यांवर सखोल असे मार्गदर्शन सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांना केले.

### टेबल टेनिस स्पर्धेत सौ. के.एस.के महाविद्यालयाला उपविजेते पद



**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व बलभिम महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेमध्ये सौ. के.एस.के महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विद्यापीठाचे उपविजेते पद प्राप्त केले. बक्षीस वितरणा समयी विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, डॉ. दयानंद कांबळे, आयोजन समितीचे डॉ. तत्तापुरे, विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. वनगुजरे तसेच डॉ. पंकज दिखत या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उपविजेते पदाचा चषक संघातील खेळाडू कु. मयुरी मानुरकर, कु. हर्षदा उबाळे, कु. सुजाता जोशी, कु. गायत्री जोशी क्रीडा संचालक डॉ. भागचंद सानप, मार्गदर्शक श्रीकांत व्यवहारे यांनी स्विकारला. खेळाडूंच्या या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. किशोर काळे, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमविचे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# जरेवाडीतील आगीत खामकर यांच्या घराची झाली राख भाऊसाहेब आण्णा भवर बनले आधाराचा हात!

**पाटोदा । प्रतिनिधी**

जरेवाडी गावात हनुमान खामकर यांच्या राहत्या घराला लागलेल्या आगीत काही क्षणांतच सर्व काही जळून खाक झाले. कष्टाने उभारलेले घर, संसाराचा प्रत्येक कोपरा क्षणभरात राखेत परिवर्तित झाला. डोळ्यांसमोर आयुष्यभराची जमा-पूंजी जळताना पाहून खामकर कुटुंबाचे डोळे अश्रूंनी भरून आले.या दुःखाच्या काळात अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे नेते भाऊसाहेब आण्णा भवर यांनी गावात येऊन जळीतग्रस्त कुटुंबाला भेट दिली. त्यांनी आधाराचा हात देत मनापासून दिलासा दिला. त्यांच्या चेहऱ्यावरची माया आणि



आपुलकी पाहून कुटुंबातील प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रूंऐवजी कृतज्ञतेचे पाणी दाटले.भाऊसाहेब आण्णा भवर यांनी संकटग्रस्त कुटुंबाला ₹२१,०००/- ची आर्थिक मदत देत माणुसकीचा सुंदर आदर्श घालून दिला.त्यांनी केवळ पैशांनी नव्हे, तर आपल्या उपस्थितीने आणि मनःपूर्वक शब्दांनी जखमी मनांना मलम लावले.आगीत आमचं सर्व काही गेलं, पण भाऊसाहेबांनी दिलेला आधार आम्हाला नवसंजीवनी देऊन गेला, असे अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी खामकर यांनी सांगितले. गावकऱ्यांनी एकमुखाने म्हटलं संकटात माणसाची ओळख होते... आणि भाऊसाहेब आण्णा भवर यांनी खरी माणुसकी दाखवली

### बीड जिल्हा ज्युनियर रोल बॉल स्पर्धा व संघ निवड चाचणी २०२५




**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य संघटना यांच्या वतीने ज्युनियर महाराष्ट्र राज्य रोल बॉल चॅम्पियनशिप २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

सदर स्पर्धा साठी बीड जिल्हा रोल बॉल असोसिएशनच्या वतीने रोल बॉल मैदान जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हास्तर स्पर्धा व संघ निवड चाचणी चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धांमधून उत्कृष्ट संघ निवडून जळगाव येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धामध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. सदर स्पर्धांसाठी पात्रता: ०१/०१/ २००९ व नंतर जन्मलेले खेळाडू चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्यास पात्र असतील. अशी माहिती संघटनेचे सचिव श्री रामदास गिरी यांनी दिली.खेळाडू नोंदणी शुल्क (जिल्हा) ३००/- प्रती खेळाडू. खेळाडू नोंदणी शुल्क (तालुका) ३००/- प्रती खेळाडू. सहभागी संघांनी त्यांच्या संबंधित गणवेशात असणे आवश्यक आहे. तसेच सर्व ▶ उर्वरित पान २ वर

### अंत्यविधी कार्यक्रमात पिकअप घुसला ; एक मयत, एक गंभीर अनेक जण जखमी

**• बीड तालुक्यातील पाली परिसरातील दुर्दैवी घटना !**

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाली येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यविधी सुरू असतानाच भरधाव वेगाने येणारा पिकअप अंत्यविधी कार्यक्रमात घुसल्याने एक जणांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर असून सात ते आठ जण जखमी झाले आहे. जखमींवर बीड शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. पाली परिसरातील स्मशान भूमी या ठिकाणी आज (ता. १५) सायंकाळी स्वर्गीय आसराबाई किसनराव नवले यांचा अंत्यविधी सुरू होता. याच दरम्यान भरधाव वेगाने येणारा पिकअपवरील चालकाचे संतुलन सुटल्यामुळे हा पिकअप अंत्यविधी मध्ये घुसला यात संभाजी विठ्ठलराव जाधव (रा. रोळसगाव वय ५०) हे मयत झाले व मसू जगताप करचुंडी वय ४५ वर्ष व आश्रुबा शिंदे हे जखमी असून यांच्यासह आठ ते दहा जण अपघातात जखमी झाले आहेत. यांच्यावर शहरातील विविध रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संघटन नितीन धांडे,राहुल नवले,अनिल साळुंखे,शरद नवले,अतुल नवले,रमेश नवले, तुकाराम धसे यांनी तात्काळ जखमींना रुग्णालयात नेण्यास मदत केली.

### तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीला राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार २०२४-२५




**माजलगाव । प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सभासदांच्या प्रगतीला प्राधान्य देणाऱ्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव या संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ संस्थेला ▶ उर्वरित पान २ वर

# सामाजिक उपक्रम राबवून विनायक रत्नपारखी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

भाजपा शहर मंडळ अध्यक्ष तथा मा .नगरसेवक भाजपाचे लोकप्रिय युवा नेते विनायक रत्नपारखी यांचा वाढदिवस विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला . भाजप मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.सकाळी मंगलनाथ मंदिर येथे पूजा व महाआरती करून सर्व जनतेसाठी प्रार्थना केली की



मराठवाड्यामध्ये अति प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे पूरपरस्थिती निर्माण झाली व त्या परिस्थितीतून सावरण्याची शक्ती दे , व सर्वांचे आरोग्य उत्तम लाभावे अशी प्रार्थना केली. तसेच विनायक रत्नपारखी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्वर्गीय हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चारिटेबल ट्रस्ट अमरावती व श्रीराम संस्थान नांदगाव पेठच्या सौजन्याने अमरावती येथील भाजपा उपाध्यक्ष विवेक गुहलानी यांच्या वतीने मंजरथ येथील १०० गरजू गरीब शेतकरी शेतमजूर पूरग्रस्त व्यक्तींना किराणा किटचे वाटप केले . मंजरथ येथील ३० गरजू व अपंग व्यक्तींना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. ▶ उर्वरित पान २ वर

### वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सक वृत्तीने त्याकडे पाहण्याची गरज : डॉ. संजय तुपे



**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन शनिवार दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या आयसीटी हॉल मध्ये करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी व्याख्याते म्हणून कालिकादेवी महाविद्यालय शिरुर कासार येथील उपप्राचार्य व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय तुपे हे होते. यावेळी त्यांनी असे सांगितले की, जीवनात प्रत्येक क्षणोक्षणी भौतीकशास्त्राचा उपयोग ▶ उर्वरित पान २ वर

# पोलिस अधीक्षक नवनित कांवत साहेबांनी पोलिसांच्या नावापुढे आडनाव लावणे बंद केले असताना प्रेस नोटमध्ये संपूर्ण नाव लिहिण्याचे कारण काय? : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

काही महिन्यांपूर्वी बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांच्या नेमप्लेटवरून आडनावे हटवून फक्त नाव आणि पद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. पोलिस हे सर्व समाजासाठी एकसमान



आहेत, त्यांच्या वर्दीत कोणतीही जात नाही. आम्ही फक्त पोलीस आहोत, एखादा पोलीस चुकीचा असेल तर त्याच्यावर कारवाई होईल; पण जातीवरून ओळख निर्माण होऊ नये, असे स्पष्ट वक्तव्य त्यावेळी पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी केले होते. या निर्णयामुळे पोलिसांविषयीचा जातीवर आधारित अविश्वास कमी होईल, असा उद्देश होता.मात्र, पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या प्रेस नोट्समध्ये पोलिस कारवायांशी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची पूर्ण नावे (आडनावासह) नमूद केली जातात, एवढेच नव्हे तर संबंधितांचे फोटोसह प्रकाशन देखील केले जाते.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, पोलिसांच्या नावापुढे आडनाव न लावण्याचा आदेश दिला असताना अधिकृत प्रेस नोटमध्ये मात्र पूर्ण नाव आणि आडनावासह फोटो प्रसिद्ध करण्याचे कारण काय? अशा स्थितीत या उपक्रमाचा प्रत्यक्षात काय उपयोग राहतो ?

डॉ. गणेश ढवळे यांनी या विसंगतीवर प्रशासनाचे लक्ष वेधत स्पष्ट केले की, जर उद्देश पोलिसांवरील जातीय ओळख कमी करणे हा असेल, तर तो सर्वच स्तरांवर काटेकोरपणे पाळला गेला पाहिजे.